मासिक

# स्नेहीजन

संपादक :- छगन मुळे



# वसंतोत्सव



प्रा. वसंतरावजी कर्डिले

डॉ. सज्जन थूल यांना
सप्रेम भेट






मासिक
# स्नेहीजन

**संपादक :- छगन मुळे**

## प्रा. वसंतरावजी कर्डिले सर यांचा अमृत महोत्सवी विशेषांक

# वसंतोत्सव

**संपादक / संकल्पना : छगन मुळे**

**अक्षर रचना व मुद्रक : श्री गणेश एन्टरप्राईजेस**
**शॉप नं. ७, शिवनेरी कॉम्प्लेक्स, शिवाजी रोड, वावरे लेन, नाशिक.**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक छगन भगवानराव मुळे यांनी
**श्री गणेश एन्टरप्राईजेस,नाशिक** येथे छापून ८४१, लक्ष्मी चौक, पाटोदा,
जि. बीड येथे प्रसिद्ध केले आहे. फोन : ०२४४४-२४२२३३ मो :९४२२९३१८९०
**Email : snehijan123@gmail.com**
रजि. नं : १६४१७/९७/दिल्ली

(या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

**वर्ष : १९ वे । अंक १/२ माहे. सप्टेंबर-ऑक्टोंबर २०१५**

## वसंतोत्सव

# अंतरंग


| | | |
|---|---|---|
| १) | नाबाद ७५-प्रा.वसंतराव कर्डिले यांची बांधिलकीची वाटचाल | भालचंद्र वैरागी / २५ |
| २) | मित्रास पत्र | बेळे सावकार / २७ |
| ३) | प्रासंगिक विचारांचा सच्चा मित्र | डॉ.अनंत नरहरी जोशी / २९ |
| ४) | हिरवं मोरपीस | प्रा.लक्ष्मण महाडिक / ३० |
| ५) | एका श्रध्देय प्रतिभावंताचा अमृत महोत्सव | श्रीमती शकुंतला शिरसाठ / ३३ |
| ६) | तेली समाजातील कोहिनूर हिरा | डॉ.शरद महाले / ३७ |
| ७) | चालता बोलता ज्ञानकोष - दादा | डॉ.शांताराम राणुजी रायते / ४० |
| ८) | ज्ञानाचे भांडार - वसंतराव कर्डिले | संतोषभाऊ चौधरी / ४३ |
| ९) | छाया वसंत ऋतुची | डॉ.कविता साळुंके / ४४ |
| १०) | बहुआयामी व्यक्तिमत्वाला सलाम | डॉ.संजीवनी महाले / ४६ |
| ११) | ज्ञानमयी विज्ञानमयी - प्रा.कर्डिले सर | डॉ.सुधाकर चौधरी / ४७ |
| १२) | शिक्षणशास्त्रातील दादा | प्रा.के.के. जाधव / ४९ |
| १३) | चिन्मयी व वाङ्मयी प्रा.वसंतराव कर्डिले | संजीव शेलार / ५१ |
| १४) | शिक्षक समाजातील चालता बोलता ज्ञानकोष | डॉ.सुभाष भालेराव / ५३ |
| १५) | स्नेहीजन - प्रा.वसंतराव कर्डिले | शांताराम गो.देशमाने / ५४ |
| १६) | ज्ञानाचा दीपस्तंभ | सौ.सुनिता पोपटराव गवळी / ५५ |
| १७) | प्रा.कर्डिले सर - एक गुरू आणि पालक | डॉ.विजया विनायक पाटील / ५७ |
| १८) | शैक्षणिक प्रबोधनाचे प्रणेते | सतिश वैरागी / ५९ |
| १९) | आचार्य त्यागमुर्ती द्रोणाचार्य - प्रा.वसंतराव कर्डिले | पंढरीनाथ सोनवणे / ६१ |
| २०) | प्रा.कर्डिले सर - ज्ञानयोगी वक्ता | डॉ.सज्ञन थूल / ६३ |
| २१) | ज्ञानदीप वंदनीय गुरूवर्य - प्रा.कर्डिले सर | प्रा.सौ.मीना रसाळ / ६४ |
| २२) | प्रा. वसंत कर्डिले सरांना प्रणाम | सदाशिव वालझाडे / ६६ |
| २३) | एक समर्पित झाले जीवन | सौ.जयश्री सतिश वैरागी / ६८ |
| २४) | ज्ञानाचा सदाबहार वसंत | प्रा.एस.आर.वाजे - ६९ |




Graphics India, Akola 9422862936



# प्रा. कर्डिले सर -ज्ञानयोगी वक्ता

- डॉ. सज्ञन थूल
नाशिक

प्राध्यापक वसंतराव कर्डिले यांचेशी संबंध सन २००१ साली आला. त्यांचेशी झालेल्या पहिल्या भेटीतच त्यांची ज्ञान कक्षा लक्षात आली. त्यांनी अनेक विषयावरील लेखन केलेले आहे असे समजल्यानंतर त्यांची चतुरस्त्र विचारशैली उमगली. कोणताही विषय असो की आशय त्यांचे भाष्य बऱ्याच संकल्पनांना उजेडा देत असत. त्यांची मौलिक विचारसरणी संदर्भज्ञानाचा आधार, भाषेवर प्रभुत्व, जनसंवाद वाढविण्याची दृष्टी, माणुसकी आणि स्पष्ट वक्ता म्हणून समाजात त्यांचेविषयी आदरार्थ बोलले जात आहे. माणूस किती मोठा झाला तरी वयाने असो की, अनुभवाने अध्ययनाच्या कक्षा कधीच संपत नाही.



अशी त्यांची विचार धारणा आहे. ती समर्पकही आहे. जगात दररोज ज्ञाननिर्मिती होत आहे तसेच अस्तित्वात असलेली माहिती. मिळविता-मिळविता संपूर्ण आयुष्य खर्ची घालांव लागत. म्हणूनच प्रा वसंत कर्डिले म्हणतात की, प्रत्येक व्यक्तीने आयुष्यभर ज्ञानार्थी राहिले पाहिजे.

शरीर, मन आणि भावना यांचा सुरेख संगम करता यावा, की ज्यामुळे प्रत्येकाची सुयोग्य प्रज्ञा विकसित होते, असे एकदा त्यांचेशी झालेल्या चर्चेतून दिसून आले. प्रत्येक जन ज्ञान घेऊन स्वयं विकास करतो परंतु चांगल्या प्रज्ञेद्वारे त्या व्यक्तीचा सर्वांग, सुयोग्य विकास होतो. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीजवळ मूल्याचे अधिष्ठान असावे असे प्रा. वसंत कर्डिले यांचे ठाम मत आहे. वास्तव ज्ञान, शाश्वत द्रष्टा, भावनिक बुद्धिमत्ता आणि क्रियाकौशल्य विकास झाल्याखेरीज समाजाच्या सह राष्ट्राच्या विकासात भर घालण्याचे सामर्थ्य व्यक्तीत निर्माण होत असते. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने एक दुसऱ्यांशी व्यवहार हा निसर्ग नियमानुसार व्हायला पाहिजे असे मत प्रा. कर्डिले सर यांनी माझ्यासोबत सेमिनारसाठी अकोल्याला जात असताना मांडले होते. व्यक्ती विकासाची पाहिली पायरी भक्कम तयार झाली तर पुढच्या विकासाच्या पायऱ्या आपोआप निर्माण होत असतात. त्यातली पहिली म्हणजे समाजाविषयी असलेले भान, समाजासाठीचं देणं आणि समाजाचा उद्धार होय, कुंटुंबाच्या विकासासह समाजाचा उध्दार करावयाचा निर्धार प्रा. वसंत कर्डिले यांनी घेतला आहे. समाजासाठी चालवित असलेल्या मासिकासाठी अनेक लेख व संपादकीय लेखातून समाजाला जागृत करण्याचे कार्य आजही करीत आहे. एवढा मोठा प्रदीर्घ कार्याचा दिवा ते आजही तेवत आहे. हे कार्य अविस्मरणीय आहे. कित्येक वर्षांपासून देत असलेली त्यांची सेवा नकीच सत्कर्मी लागेल अशी मनस्वी इच्छा बागळते. त्यांच्या भावी कार्यास शुभेच्छा!

***